**ठळक बातम्या**

- उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर, ९ सप्टेंबरला मतदान
- बिहारमध्ये विशेष मतदार यादी पुनरीक्षणानंतर ६५ लाखांहून अधिक मतदारांची नावं वगळली
- अवैध बेटिंग ॲप्स प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची केंद्र आणि राज्य सरकारांसह बेटिंग ॲप्सला नोटीस
- ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 12th fail ठरला सर्वोत्कृष्ट चित्रपट, विक्रांत मस्सी, शाहरुख खान, आणि राणी मुखर्जीला अभिनयासाठी पुरस्कार जाहीर

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात भारताचा पहिला डाव २२४ धावात आटोपला

**<><><><><><>**

नव्या उपराष्ट्रपतींची निवड करण्यासाठी भारत निवडणूक आयोगानं आज निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. येत्या ७ ऑगस्टला निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी होईल. २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत राहील तर ९ सप्टेंबरला मतदान होणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झालं आहे. आयोगानं या निवडणुकीसाठी मतदार संघातल्या सदस्यांची यादी अद्ययावत केली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य उपराष्ट्रपती निवडतात.

**<><><><><><>**

विविध मुद्द्यांवर गदारोळ झाल्यानं संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं. बिहारमधलं मतदारयाद्या पुनरिक्षण रद्द करावं या मागणीसाठी विरोधकांनी गदारोळ केला.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूर दरम्यान शस्त्रसंधीबाबत भारत आणि पाकिस्तान यांच्यात थेट चर्चा झाली, पाकिस्तानबरोबरचा कोणत्याही प्रलंबित प्रश्नावर फक्त दोघांमधेच चर्चा होईल, असं भारतानं अमेरिकेसह सर्व देशांना स्पष्टपणे सांगितलं होतं, असं परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंग यांनी आज लोकसभेत सांगितलं. अमेरिकेच्या एफ ३५ लढाऊ विमान विक्रीच्या प्रस्तावावर औपचारिक चर्चा झालेली नाही, असं त्यांनी याबाबत विचारलेल्या प्रश्नावर सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आपल्या दोन दिवसीय झारखंड दौऱ्यात आज धनबादच्या आयआयटी, अर्थात भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि आयएसएम अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या च्या ४५ व्या दिक्षांत समारंभात उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी उत्प्रेरक म्हणून काम करण्याचं आवाहन केलं. यावेळी राष्ट्रपतींनी संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकीमध्ये उच्च दर्जाचे बीटेक पदवीधर प्रियांशु शर्मा यांना राष्ट्रपती सुवर्णपदक प्रदान केलं. तसंच प्रधानमंत्र्यांचे प्रधान सचिव पी के मिश्रा यांना डीएससी पदवी प्रदान करण्यात आली.

<><><><><>

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या होणार आहे. प्रधानमंत्री उद्या उत्तर प्रदेशात वाराणसीच्या दौऱ्यावर असतील. यावेळी प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत नऊ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना २० हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम

वितरित केली जाईल. उत्तर प्रदेशातल्या २ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीसाठीच्या मतदार यादीचा मसुदा निवडणूक आयोगानं आज प्रसिद्ध केला. यात ७ कोटी २४ लाख मतदारांचा समावेश आहे. गेल्यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदार यादीत नाव असलेल्या ६५ लाख ६२ हजार जणांना या यादीतून वगळण्यात आलं आहे. विशेष मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रमानंतर ही यादी जाहीर झाली आहे. पाटण्यातून सर्वाधिक सुमारे ४ लाख नावं वगळण्यात आली.

यासंदर्भात आक्षेप असणाऱ्या मतदारांना १ सप्टेंबरपर्यंत दावे दाखल करता येतील. त्यांच्या पडताळणीनंतर अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल.

<><><><><>

देशात अवैध बेटिंग ॲप्सवर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आज सर्व राज्य सरकारं, भारतीय रिझर्व बँक, सक्तवसुली संचालनालय, आणि दूरसंवाद नियामक प्राधिकरण-ट्राय ला नोटीस जारी केली आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने गूगल इंडिया, ॲपल इंडिया, ड्रीम इलेव्हन, मोबाईल प्रीमीयर लीग आणि ए ट्वेंटीथ्री गेम्स या कंपन्यांनाही नोटीस बजावली आहे.

चित्रपटसृष्टीतले तारे, क्रिकेटपटू आणि इतर प्रभावशाली मान्यवरांनी अशा बेटींग ॲपविषयी सर्वसामान्यांची दिशाभूल केल्याबाबतची तक्रार गेल्या मार्चमधे तेलंगण पोलीसात दाखल झाली होती. तसंच बेटींग करुन झालेलं कर्ज फेडता येत नाही म्हणून तेलंगणात २४ जणांनी आत्महत्या केल्याचं सांगणारा लेख

वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाला होता, त्या आधारे ही जनहित याचिका दाखल झाली आहे. पुढची सुनावणी येत्या १८ ऑगस्टला आहे.

<><><><><>

बंगळूरूमधल्या लोकप्रतिनिधींसाठी असलेल्या विशेष न्यायालयानं आज धर्मनिरपेक्ष जनता दल पक्षाचे नेते आणि माजी खासदार प्रज्वल रेवण्णा याला बलात्कार प्रकरणात दोषी ठरवलं. हा रेवण्णा याच्या विरोधात हसन जिल्ह्यात दाखल झालेल्या चार बलात्कार प्रकरणांपैकी एका प्रकरणातला निकाल आहे. या प्रकरणी उद्या शिक्षा सुनावली जाण्याची शक्यता आहे.

<><><><><>

मुंबई उच्च न्यायालयाचं खंडपीठ कोल्हापूरात स्थापन करण्याची मागणी मंजूर झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे यांनी यासंदर्भातलं राजपत्र आज प्रसिद्ध केलं. १८ ऑगस्टपासून हे खंडपीठ कार्यरत होईल.

<><><><><>

७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 12th fail हा राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला आणि या चित्रपटातला अभिनेता विक्रांत मस्सी याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार विभागून जाहीर झाला आहे. जवान चित्रपटासाठी शाहरुख खान यालाही सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला आहे. शाहरुखचा हा पहिलाच राष्ट्रीय पुरस्कार असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार चॅटर्जी वर्सेस नॉर्वेसाठी राणी मुखर्जीला मिळणार आहे. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार द केरळ स्टोरीचे दिग्दर्शक सुदीप्तो सेन यांना जाहीर झाला. याशिवाय सर्वोत्कृष्ट सिनेमॅटोग्राफीचा पुरस्कारही याच चित्रपटाला मिळाला. शिल्पा राव सर्वोत्कृष्ट गायिका आणि PVNS रोहित सर्वोत्कृष्ट

गायक ठरला. नवी दिल्लीत झालेल्या वार्ताहर परिषदेत निवड समितीचे अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी हे पुरस्कार जाहीर केले.

सर्वोत्कृष्ट बाल चित्रपटाचा पुरस्कार ‘नाळ २’ या चित्रपटाला जाहीर झाला. या चित्रपटाचे दिग्दर्शक सुधाकर रेड्डी यंकट्टी यांनी या पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

**होल्ड बाईट- सुधाकर रेड्डी यंकट्टी (नाळ २ दिग्दर्शक) (२४ सेकंद)**

सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार ‘श्यामची आई’ चित्रपटाला जाहीर झाला आहे. नवोदित दिग्दर्शकाचा पुरस्कार आशिष बेंडे यांना ‘आत्मपॅमफ्लेट’ साठी जाहीर झाला आहे. सर्वोत्कृष्ट बाल कलाकारांचा पुरस्कार जिप्सीसाठी कबीर खंदारे, नाळ २ साठी त्रीशा ठोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव यांना मिळाला आहे.

**<><><><><><>**

देशाची संरक्षण सामुग्री केवळ राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक निर्णय या निकषांवरच खरेदी केली जाते असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत बोलत होते. वीज खरेदीबाबत बाजारपेठेत उपलब्ध प्रस्ताव  आणि  जागतिक परिस्थिती यावर आधारित निर्णय घेतले जातात असं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

रशियाबरोबरच्या संबंधाविषयी ते म्हणाले की, कोणत्याही राष्ट्राबरोबरच्या द्विपक्षीय संबंधांकडे त्रयस्थ राष्ट्राच्या दृष्टिकोनातून पाहता कामा नये. भारत - रशिया संबंध जुने आणि काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेले आहेत. अमेरिकेबरोबरचे संबंध परस्पर हिताच्या आणि लोकशाही मूल्यांच्या बळावर आधारलेले असून सध्या परिवर्तानतून जात आहेत. मात्र भविष्यात ही भागिदारी विशेषतः संरक्षण क्षेत्रातलं सहकार्य वृद्धिंगत होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यमनमधे निमिषा प्रिया या परिचारिकेचा मृत्युदंड रद्द झाला असून त्याकरता विशेष करार झाल्याचं वृत्त चुकीचं आहे असं त्यांनी सांगितलं, मात्र तिला वाचवण्याचा प्रयत्न सरकार कसोशीने करत असून तिच्या शिक्षेची अंमलबजावणी पुढं ढकलण्यात आली आहे असं जयस्वाल म्हणाले.

<><><><><>

थायलंड आणि कंबोडिया दरम्यानच्या सीमाप्रश्नावर चर्चा करण्यासाठी थायलंडनं दिलेल्या प्रस्तावाचं कंबोडियानं स्वागत केलं आहे. या प्रश्नावर पुढच्या आठवड्यात मलेशियामध्ये चर्चा करण्याचा प्रस्ताव थायलंडनं दिला आहे. कंबोडियाच्या संरक्षण मंत्रालयाच्या प्रवक्त्यानं ही माहिती दिली. कंबोडियाचे संरक्षण मंत्री आणि थायलंडचे उप-संरक्षण मंत्री या बैठकीत सहभागी होती.

अलिकडेच २४ जुलैला कंबोडिया आणि थायलंडच्या सैनिकांमध्ये वादग्रस्त सीमेवर सशस्त्र संघर्ष झाला होता. त्यानंतर २८ जुलै ला दोन्ही देशांनी युद्धबंदीवर सहमती दर्शवली होती.

<><><><><>

अमेरिकेचा दबाव वाढत असतानाही, युक्रेनसोबतच्या युद्ध विरामासाठी आपल्या अटींमध्ये कोणताही बदल झालेला नसल्याचं रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी स्पष्ट केलंय. ते मॉस्को इथं बातमीदारांशी बोलत होते. रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांना समाधानकारक वाटू शकेल आणि दोघांचीही सुरक्षा सुनिश्चित होऊ शकेल अशा मजबूत पायावर आधारित कायमस्वरुपी स्थिर शांतता प्रस्थापित करण्याची गरज असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरी प्रकारात भारताच्या लक्ष्य सेन आणि थरुन मन्नेपल्ली यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यानं चीनच्या झू झुआन चेन याला २१-१४, १८-२१, २१-१४ असं पराभूत केलं. आता त्याची लढत

इंडोनेशियाच्या अल्वी फरहान याच्याशी होईल. थरुन मन्नेपल्ली याने चीनच्या हू झे अन याला २१-१२, १३-२१, २१-१८ असं नमवलं पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना पराभव पत्करावा लागला.

**<><><><><><>**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात आज दुसऱ्या दिवशी भारताचा पहिला डाव २२४ धावात आटोपला. करुण नायरच्या ५७ धावा ही भारताच्या या डावातली सर्वोच्च वैयक्तिक खेळी ठरली. महंमद सिराज, आणि प्रसिद्ध कृष्णा शून्यावर बाद झाले. इंग्लंडतर्फे गस ॲटकिन्सननं ५, तर जोश टंगनं ३ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा इंग्लंडच्या ५ बाद २०५ धावा झाल्या होत्या. महम्मद सिराज यानं ३ बळी टिपले.

**//<><><><><><>//**